## नवरात्र

बंगालमध्ये नवरात्र हा उत्सव फारच मोठा असतो. शाळा कॉलेजांना सुट्टी असते. आपला गणेशोत्सव असतो ना तसाच ह्या उत्सवाच स्वरूप असतं. तिथे देवीला दुर्गा, कालिका म्हणतात आणि नवरात्रीला दुर्गापूजा म्हणतात. त्याला आता सार्वजनिक सणाचे स्वरूप प्राप्त झालं आहे. बंगालमध्ये दुर्गापूजा धुमधडाक्याने साजरी होते.

उत्तर भारतात त्याची वेगळीच कथा मानली जाते. या नऊ दिवसात श्रीरामांनी रावणाशी युद्ध केल आणि त्यानी दहाव्या दिवशी रावणाचा वध केला, अशी गोष्ट सांगतात. हा रामाचा विजय म्हणून हा सण असं म्हणतात. म्हणून रामलीला ह्या संगीत नाटका सारखे नृत्याचे कार्यक्रम ठिकठिकाणी होतात. दहाव्या दिवशी दहातोंडी रावणाची कागद व फटाक्याने भरलेली मुर्ती करुन ती पेटवून देतात.

प्रश्न.

१) बंगालमध्ये कोणता मोठ्ठा सण असतो?

२) देवीला काय म्हणतात?

३) उत्तर भारतात काय करतात?

४) कोणते नाटक करतात?

---

## माझा गाव

माझा गाव समुद्रकिनाऱ्यावर वसला आहे. माझ्या गावाचे नाव गुहागर असे आहे. एका बाजुला अफाट सागर व दुसऱ्या बाजुला

उंचच उंच डोंगर आहेत. गावाची वस्ती अंदाजे एक हजार घरांची आहे.

गावातील माणसे शेती व मासेमारी करतात. गावात एक प्राथमिक व एक माध्यमिक शाळा आहेत. तेथे गावातील मुले शिकतात. गावातील सर्व माणसे उद्योगी आहेत. सर्वजण आपापसात प्रेमाने वागतात. कोणीही भांडत नाहीत.

गावात एक मोठे देऊळ आहे. गावाजवळून एक छोटीशी नदी वाहते. तिचा तेथे सागराशी संगम होतो. तेथे वर्षातून एकदा जत्रा भरते. गावाचा बाजार दर गुरवारी असतो.

माझ्या गावाला आता सरकारने आदर्शगाव म्हणून जाहीर केले आहे. मला माझा गाव फार आवडतो.

प्रश्न

१) माझ्या गाव कुठे आहे?

२) गावात किती शाळा आहेत?

३) गावातील लोकांचा मुख्य धंदा काय?

४) सरकारने कोणते बक्षिस दिले?

---

## पावसाळा

पावसाळा हा माझा आवडता ऋतु आहे. पाऊस येण्यापुर्वी जोराने वारे वाहू लागतात. आकाशात काळे ढग जमू लागतात. विजा कडकड आवाज करून चमकू लागतात. मग पावसाचे मोठे मोठे थेंब जमिनीवर पडू लागतात.

पाऊस आल्यामुळे जिकडे तिकडे छान दृश्य तयार होते. मोर आनंदाने नाचू लागतात. नद्यांना पूर येतात. शेतकरी आपल्या शेतात धान्याची पेरणी करतो. शेते व जंगले हिरवी गार दिसू लागतात.

मुलांना पाऊस खूप आवडतो. ते पावसात भिजतात, नाचतात व "येरे येरे पावसा" अशी पावसाची गाणी म्हणतात.

पाऊस नसता तर? पाऊस नसला तर आपण जगूच शकणार नाही. कारण माणसाच्या जीवनात पाण्याला खूप महत्व आहे, म्हणूनच पाण्याला 'जीवन' असे म्हणतात. म्हणूनच जीवनदाता पाऊस हा मला खूप खूप प्रिय आहे.

प्रश्न

१) पाऊस येण्यापूर्वी काय होते?
२) पाऊस आल्यानंतर काय होते?
३) मुले कसा आनंद दाखवितात?
४) पावसाला कोणते नाव दिले? कां?

---

## संवाद

"काय रे मोहन कधी आलास?"
"दोन दिवस झाले."
"परीक्षा झाली?"
"हो झाली"
"कितवीत जाणार आता?"
"सहावीत."
"सुट्टी किती दिवस?"

"९ जुलै पर्यंत."
"मग राहणार आहेस ना सुट्टी संपे पर्यंत?"
"नाही आई येईल २० जुन ला तिच्याबरोबर जाईन"
"बाबा येणार आहेत की नाही?"
"नाही. त्यांना रजा नाही."
"येतांना कोणाबरोबर आलास?"
"अमोलकाकांच्या बरोबर आलो."
"घरी येऊन जा हं आमच्या बागेत चेरी आल्या आहेत त्या खायला ये."

प्रश्न.
१. मोहनने कितवीची परीक्षा दिली आहे?
२. मोहनला किती तारखे पर्यंत सुट्टी आहे?
३. मोहन कोणाबरोबर घरी परत जाणार आहे?
४. कोणते फळ खायला मोहनला बोलावले आहे?
५. मोहनल कोणाबरोबर गावात आला?

---

रविवारचा दिवस होता. थोड्या उशीराच मी जागा झालो. नेहमीप्रमाणे वर्तमानपत्राचा अंक दाराबाहेर पडलेला दिसला नाही. वाटले, रविवार असल्यामुळे वर्तमानपत्र  टाकणाऱ्या मुलाने पण सुट्टी घेतली की काय? थोडी वाट पाहिली व रेडिओ चालू केला. सकाळच्या बातम्या चालू होत्या. बातमीदार सांगत होता " कागदाची तीव्र टंचाई व महागाई म्हणून कारखान्यातील कामगारांच्या संपामुळे काही दिवस

वर्तमानपत्रे बंद राहतील." मला मात्र सकाळचा चहा पिताना मजा आली नाही.

प्रश्न

१) रविवारी मी कशाची वाट पहत होतो?
२) वर्तमानपत्र का आले नाहे?
३) कागदाची टंचाई कशामुळे होत असेल?
४) चहा पिताना का मजा आली नाही?

---

जेंव्हा हिवाळा संपत येतो व बर्फ वितळू लागतो तेंव्हा काही मेपलच्या झाडातून गोडसर रस गळू लागतो. झाडाच्या टोकाला खिट्टी ठोकून त्याला नळी लावलेली असते. अशा अनेक नळ्या लावतात. सर्व रस एका मोठ्या पिंपात गोळा करतात. ते पिंप मोठ्या चुलण्यावर ठेवतात. खाली लाकडाचा जाळ पेटवून तो रस उकळवतात व आटवतात. रस घट्टसर झाला की बाटलीत भरतात. तोच हा "मेपल सिरप".

प्रश्न

१) मेपलच्या झाडातून केंव्हा रस गळतो?
२) तो रस कसा गोळा करतात?
३) रसाचे पुढे काय करतात?
४) मेपल सिरप कशाबरोबर खातात?
५) मेपलच्या झाडांची पाने कशी असतात?

---

"आजोबा, कुठे निघाला तुम्ही? आणि हा पिंजरा कोणासाठी?"
"मी चाललो सशाच्या शिकारीला. बघच त्याला पकडून आणतो की नाही."
"पण शिकार म्हणजे प्राण्याला मारतात ना? पूर्वी लोक वाघाची शिकार करायचे. तसे तुम्ही सशाला मारणार?"
"छट्. अरे, शिकार असे गंमतीने म्हटले."
"मग सशाला तुम्ही का पकडणार. ससा किती छान असतो."
"तो ससा माझ्या बागेतील सगळ्या भाज्या खायला येतो. काकडीचे कोंब, फुलांची देठ, पेरलेल्या बिया -- सगळे सगळे खातो. मी मात्र नियमित पाणी व खत घालतो. पण बागेत काहीच उगवत नाही."
"हो. मी त्याला बागेत खाताना बघितले. एक नाही दोन ससे होते."
"का नाही काठीने हाकलले तू? भिती दाखवायची"
"आजोबा, आपण त्यांच्या रानात घर बांधले. जे मिळेल ते खाणे त्यांचा हक्क आहे. तेंव्हा तुमची बाग तर त्यांची मेजवानीच"
"छान! म्हणजे पिंजऱ्यातला ससा आपला पाहुणा होणार की काय? त्यापेक्षा कुंपणच घालतो"

प्रश्न

१) हा संवाद कोणामध्ये होतो आहे?

२) शिकार म्हणजे काय? कोण शिकारीला चालले?

३) आजोबांना ससा कां पकडायचा?

४) आजोबा बागेत कष्ट करतात पण बागेवर कुणाचा हक्क आहे असे तुम्हास वाटते?

५) तुम्ही ससा पाळला तर त्याची काळजी कशी घ्याल?